**20**

# कोल्हापूर जिल्ह्यातील अनुसूचित जाती व इतर जातीतील सामाजिक, राजकीय संबंधाचा अभ्यास (विशेष संदर्भ आजरा तालुका)

**प्रा. नंदकुमार रामचंद्र कोल्हापूरे**
सहयोगी प्राध्यापक व राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
शिवराज महाविद्यालय, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर

***********

## प्रस्तावना

भारतातील समाजव्यवस्था ही वर्णव्यवस्थेवर आधारीत होती. वर्णव्यवस्थेनुसार ब्राह्मण, क्षेत्रीय, वैश्य व शुद्र असे वर्ण मानले जात होते. या वर्णानुसार प्रत्येकाचे काम ठरलेले होते. या चार वर्णाव्यतिरिक्त अतिशुद्र असा समाज होता. यामध्ये अनुसूचित जातीतील लोकांचा समावेश आहे. या जातीतील लोकांची अस्पृश्यता पाळली जात होती. अस्पृश्य लोकांचा स्पर्श झाल्यास विटाळ मानला जात होता. या समाजाला अपमानित जगावे लागत होते. सर्व अधिकारांपासून वंचित राहिलेला समाज गावकुसाबाहेर राहत असलेला दिसतो.

भारतातील समाजसुधारकांनी अस्पृश्यांना स्वाभिमानाने जगता यावे याकरीता समाजसुधारणेची चळवळ सुरू केली. महात्मा फुले, शाहु महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान मोलाचे आहे. याचबरोबर भारतीय संविधानाने सर्व भारतीयांना समान मानले गेले. अनुसूचित जातीतील लोकांना घटनेमध्ये शैक्षणिक, राजकीय व नोकरी इत्यादी क्षेत्रात आरक्षणाची तरतुद करण्यात आली. १९५५ च्या कायद्यानुसार कोणत्याही प्रकारची अस्पृश्यता पाळणे कायद्याने गुन्हा ठरविण्यात आला. यातून अनुसूचित जाती व इतर जातीतील सामाजिक व राजकीय संबंधात बदल झालेला दिसतो.

या अनुषंगाने कोल्हापूर जिल्ह्यातील आजरा तालुक्यातील अनुसूचित जाती व इतर जातीतील सामाजिक संबंध, राजकीय संबंध यातून सामाजिक ऐक्य व सामाजिक समता प्रस्थापित होण्यास मदत झालेली दिसते. स्थानिक पातळीवरील सामाजिक, राजकीय संबंध व अनुसूचित जातीच्या लोक प्रतिनिधींनी केलेल्या विकासकामातून समाजात झालेल्या बदलाच्या दृष्टीने संशोधन महत्त्वाचे आहे. याकरीता संशोधन केले आहे.

## संशोधन समस्यांची निवड

कोल्हापूर जिल्ह्यातील आजरा तालुका दुर्गम भागातील आहे. या तालुक्यातील अनुसूचित जाती व इतर जातीतील सामाजिक, राजकीय संबंध व अनुसूचित जातीतील लोकप्रतिनिधींनी केलेले विकास कार्य हा संशोधनाचा मुख्य अभ्यास विषय आहे.

## संशोधनाचा उद्देश

१) आजरा तालुक्यातील अनुसूचित जाती व इतर जातीतील सामाजिक संबंधाचा अभ्यास करणे.

२) आजरा तालुक्यातील अनुसूचित जाती व इतर जातीतील राजकीय संबंधाचा अभ्यास करणे.

३) अनुसूचित जातीच्या ग्रामपंचायतीतील लोकप्रतिनिधींच्या कार्याचा आढावा घेणे.

## गृहितके

१) आजरा तालुक्यातील अनुसूचित जाती व इतर जातीचे सामाजिक व राजकीय संबंध सलोख्याचे व परस्पर सहकार्याचे आहेत.

२) अनुसूचित जातीच्या लोकप्रतिनिधींनी विकास कामे केलेली आहेत.

## संशोधनाची व्याप्ती

प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती ही आजरा तालुक्यातील संशोधनासाठी निवडलेली ५ गावे व या गावातील अनुसूचित जातीतील नवबौद्ध, मातंग, चर्मकार व इतर जातीतील सामाजिक, राजकीय संबंध व अनुसूचित जातीतील लोकप्रतिनिधींच्या कार्याशी संबंधीत आहे.

## संशोधनाच्या मर्यादा

१) अनुसूचित जाती व इतर जातीतील सामाजिक, राजकीय संबंध व अनुसूचित जातीच्या



Principal
Shivraj College of Arts, Commerce,
& D.S.Kadam Science College,
Gadhinglaj.(Dist. Kolhapur)

लोकप्रतिनिधींच्या कार्याचा अभ्यास (२००२ ते २०१८ या काळापुरता मर्यादीत आहे.

२) संशोधनाची मर्यादा आजरा तालुक्यापुरती मर्यादीत आहे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत संशोधन लेखासाठी सर्वेक्षण व ग्रंथालयीन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. संशोधनासाठी माहिती संकलीत करण्यासाठी प्राथमिक आणि दुय्यम साधनाचा वापर केला आहे. प्राथमिक साधनांमध्ये संशोधनासाठी निवडलेल्या गावातील नागरिकांच्या व लोकप्रतिनिधींच्या मुलाखती घेतलेल्या आहेत. दुय्यम साधनांमध्ये संदर्भग्रंथ, लेख, पुस्तके, जनगणना अहवाल, गॅझीटेयर, शासकीय अहवाल, दैनिक वर्तमानपत्रे, मासिके, इंटरनेट इत्यादींचा वापर केला आहे.

प्रस्तुत संशोधन संशोधनात आजरा तालुक्यातील उत्तुर, पेरणोली, मुम्मेवाडी, सोहाळे व बहिरेवाडी या गावातील अनुसूचित जाती व इतर जातीचे संबंध व अनुसूचित जातीच्या लोकप्रतिनिधींच्या कार्याचा अभ्यास केला आहे.

**उत्तूर**

२०११ च्या जनगणनेनुसार उत्तूर गावची लोकसंख्या ७८२८ इतकी आहे. यातील अनुसूचित जातीची लोकसंख्या ५४२ आहे (जनगणना, २०११). याचे शेकडा प्रमाण ९.९२% आहे. उत्तूर गावातील ग्रामपंचायतीत एकूण १७ सदस्य आहेत. यापैकी अनुसूचित जातीसाठी १ जागा राखीव आहे. गावातील ग्रामपंचायतीत अनुसूचित जातीला सरपंच व उपसरपंच पदाची संधी प्राप्त झालेली नाही.

उत्तूर गावात नवबौद्ध (पूर्वाश्रमीचे महार) समाज, मातंग समाज, चर्मकार समाज आहेत. नवबौद्ध समाजातील मातंग समाजापासून चर्मकार समाज लांब अंतरावर राहतो.

या गावातील दलित आणि इतर समाजाचे संबंध सलोख्याचे आणि परस्पर सहकार्याचे आहेत. गावातील अनुसूचित जातीतील लोक इतर समाजाच्या शेतीच्या व इतर कामासाठी उपयोगी पडतात. गावातील अनुसूचित जातींना समाज आणि गावातील मातंग समाज सलोख्यात आहेत (कांबळे एस.एस., मुलाखत ९ जुलै, २०१८) यातून आपुलकीचे संबंध निर्माण झालेले दिसतात.

गावातील अनुसूचित जातीतील लोक प्रतिनिधींनी समाजातील विकास कामे केलेली आहेत. यात रस्ते, गटर्स, समाजमंदिर, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था इत्यादी कामे केलेली आहेत. ग्रामपंचायतीतील अनुसूचित जातीसाठी १५% निधीतून लोकांना साहित्य वाटप केलेले आहे. वित्त आयोगाचा निधीही खर्च केला आहे. यात ग्रामपंचायतीच्या सर्व सदस्यांच्या सहकार्यातून कामे झालेली आहेत.

**पेरणोली**

आजरा तालुक्यातील पेरणोली गावाची २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या २,२६५ आहे. या गावातील अनुसूचित जातीतील नवबौद्ध समाज, मातंग समाज, चर्मकार समाज इत्यादी समाज आहेत. या समाजाची लोकसंख्या ५५३ इतकी आहे (जनगणना, २०११). याचे शेकडा प्रमाण २४.४१% इतके आहे. राहिलेला इतर समाज आहे.

गावातील महार, मातंग आणि चर्मकार समाजाचे संबंध परस्पर सहकार्याचे आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, अण्णा भाऊ साठे जयंती व संत रोहिदास जयंतीला अनुसूचित जातीतील तिन्ही समाज एकत्र येतात. या समाजात आपुलकी दिसते.

पेरणोली गावातील अनुसूचित जाती व इतर जाती या समाजात सलोखा व सहकार्य आहे. परंतु गावातील काही लोक अस्पृश्यता पाळताना दिसतात. चर्मकार लोकांचे जेवण खात नाहीत. मंदिरातील प्रसाद अनुसूचित जातीच्या लोकांना हातामध्ये वरून दिला जातो. असे असले तरी गावातील सुशिक्षित नागरिक अस्पृश्यता पाळताना दिसत नाहीत (लोखंडे शंकर, ९ जुलै २०१८). पेरणोली गावातील दलित वस्तीतील रस्ते, गटारी, समाजमंदिर, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था इत्यादी कामे ग्रामपंचायतीतील केलेली आहेत.

**मुमेवाडी**

२०११ च्या जनगणनेनुसार मुमेवाडीची लोकसंख्या १७७० इतकी आहे. यातील अनुसूचित जातीची लोकसंख्या २०३ आहे (जनगणना, २०११). गावातील ग्रामपंचायतीमध्ये ९ सदस्य आहेत. अनुसूचित

जातीसाठी १ जागा राखीव आहे. सरपंचपद अनुसूचित जातीच्या महिलेसाठी राखीव असल्याने अनुसूचित जातीची महिला सरपंचपदी आहे.

गावातील दलित व सवर्ण यांच्यात सलोखा व परस्पर सहकार्याचे संबंध आहेत. अनुसूचित जातीचे लोक व सवर्ण (इतर जातीचे) लोक राजकारणात एकत्रित सहभागी दिसतात. यातून एकत्रित असलेल्या लोकांमध्ये आपुलकीचे संबंध आहेत (कांबळे धनश्री रविंद्र, ६ जुलै, २०१८).

मुमेवाडी ग्रामपंचायतीने दलित समाजात रस्ते, गटारी, पेव्हिंग ब्लॉक, समाजमंदिर इत्यादी कामे केलेली आहेत. दलित समाजाला मिळणारा १५ टक्के निधी वापरून समाजाला सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.

### बहिरेवाडी

बहिरेवाडी गावची २०११ च्या जनगणनेनुसार ३४४६ इतकी लोकसंख्या आहे. यातील अनुसूचित जातीची लोकसंख्या २१९ आहे (जनगणना २०११). गावच्या ग्रामपंचायतीत ११ सदस्य आहेत. अनुसूचित जातीसाठी एक जागा राखीव आहे.

या गावातील अनुसूचित जातीतील महार (नवबौद्ध), मातंग या समाजाची वस्ती आहे. या दोन्ही समाजात परस्पर सहकार्याचे संबंध आहेत. याचबरोबर अनुसूचित जाती व इतर जातींचे सामाजिक व राजकीय संबंध परस्पर सहकार्याचे आहेत.

गावातील ग्रामपंचायतीने दलित वस्तीत रस्ते, गटारी, नळपाणी पुरवठा इत्यादी कामे केलेली आहेत.

### निष्कर्ष

१) अनुसूचित जाती (दलित) आणि इतर जाती सवर्ण यांच्यात सहकार्य दिसते. दलित समाजातील व्यक्ती सवर्ण समाजाच्या शेती व इतर कामासाठी उपयोगी पडतात. त्यातून दोन्ही समाजातील लोकांमध्ये सहकार्य आहे.

२) अनुसूचित जातीतील नवबौद्ध व मातंग यांच्यातील संबंध हे सहकार्याचे, आपुलकीचे दिसतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती व आण्णाभाऊ साठे जयंतीच्या कार्यक्रमात बहुतांश ठिकाणी एकत्रित दिसतात.

३) अनुसूचित जाती (दलित) आणि इतर जाती (सवर्ण) हे राजकारणात एकत्रित असल्याने त्यांच्यात सहकार्याचे संबंध दिसतात.

४) अनुसूचित जातीच्या लोकप्रतिनिधींनी दलितवस्तीत विविध भौतिक सोयी सुविधा [illegible] कार्य केलेले आहे.

### संदर्भ


१) भारतीय जनगणना अहवाल, २०११.

२) मुलाखती

३) जिल्हा परिषदेतील दलित वस्तीत राबविलेल्या सुधारणा योजनेची नोंदवही.

४) इंटरनेट


❑❑❑